# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान(DAY-NULM) विभाग

**मानधन तत्वावरील 'समुदाय संघटक' पदांसाठी भरती प्रक्रिया**

# जाहिरात

नाशिक महानगरपालिके मधील 'दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM) अभियाना अंतर्गत समूहसंघटकाची पदे ठोक मानधनावर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने थेट मुलाखत (Walk in Interview) द्वारे भरण्यासाठी अर्हता धारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सर्व सबंधित उमेदवारांनी किमान शैक्षणिक अर्हता धारण करत असल्यास आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रासह जाहिरात प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून जाहिरातीमधील विहित नमुन्यात अर्ज सादर करावयाचा आहे. विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करून मुदतीत अर्ज महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावा.

अर्ज आवश्यक कागदपत्रासह बंद पाकिटामध्ये दि . ११/०९/२०१९ रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. ज्या अर्जदारास सदर पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या अर्जदारांने त्याचा अर्ज प्रत्यक्ष जाहिरातीत नमूद केलेल्या पत्त्यावर बंद पाकिटात समक्ष सादर करावयाचा आहे. रजिष्टर पोष्टाद्वारे/टपालाद्वारे प्राप्त झालेले अर्ज गाह्य धरले जाणार नाही. तसेच मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. विहित मुदतीत प्राप्त अर्जाची छानणी करून पात्र उमेदवारांची यादी तसेच मुलाखतीची दिनांक मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांची संगणकीय ज्ञानाची अर्हता तपासणीसाठी स्वतंत्र संगणकीय परीक्षा घेण्यात येईल.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण**- DAY-NULM विभाग, १ ला मजला, नाशिक मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, नाशिक.
**मुलाखतीचे ठिकाण**: मिटिंग हॉल, महिला व बाल कल्याण विभाग, ३ रा मजला, मनपा मुख्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक.

१) **पदाचा तपशील:**

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता | अनुभव व प्राधान्य |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | समूह संघटक मासिक मानधन १५,०००/- प्रतीमहा | १ | खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग | १)किमान १२ वी पास<br>२)संगणकामधील MS Office (Word, Excel, Power Point) यांचे ज्ञान असलेले MSCIT प्रमाणपत्र आवश्यक. | १) समाज विकास क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.<br>२) विशेषत: शहरी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तीस प्राधान्य |

२) **गुणतालिका:**

| अ.क्र | तपशिल | गुणांकन निकष | गुण |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | शैक्षणिक अर्हता | एच.एस.सी. (HSC)<br>[उदा.१००० पैकी एकूण गुण ७२४ असेल तर टक्केवारी ७२.४०% राहील. त्यानुसार ७२.४०X७०/१००= ५०.६८ असे गुण मिळतील] | ७० गुण |
| २ | समाज विकास क्षेत्रामधील काम करण्याचा अनुभव | किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक | १० गुण |
| ३ | संगणकीय ज्ञान | MSCIT प्रमाणपत्र असलेले तसेच एम.एस.ऑफिस (एम.एस.वर्ड, एक्सेल, पावर पॉईट) चे ज्ञान असणे आवश्यक राहील. | १० गुण |
| ४ | मुलाखत | विषय ज्ञान<br>[उदा.मुलाखतीमध्ये एकूण सदस्य ७ असेल व सर्वांचे मिळून एकूण गुण ३५ मिळाले तर ३५/७=५ असे गुण मिळतील] | १० गुण |

३) **<u>वयोमर्यादा</u>** :- उपरोक्त पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतिच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेद्वारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील. उमेदवारांनी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना/ राष्ट्रीय नागरी उपजीविका योजनेमध्ये किमान ३ वर्ष काम केलेले असल्यास वयामध्ये ५ वर्ष शिथीलक्षम.

४) **<u>दस्तऐवज व अर्ज करण्याची पद्धत</u>** :- महानगरपालिकेच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करून स्वाक्षरीसह अर्ज भरून त्यासोबत जन्म तारखेकरिता (जन्म प्रमाणपत्र/ वय व अधिवास प्रमाणपत्र/ १०वी चा शाळा सोडल्याचा दाखला), जातीचा पुरावाकरिता (जातीचा दाखला/ १०वी चा शाळा सोडल्याचा दाखला), १२ वीचे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र/ गुणपत्रिका, सामाजिक क्षेत्रातील किमान ५ वर्षाचा अनुभवाचा दाखला (अ.क्र. ५ मधील अनुभव प्रमाणपत्राबाबतचा मुद्दामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रमाणपत्र/ दस्तऐवज), फोटो आयडीसाठी मतदान ओळखपत्र/ आधारकार्ड/ पॅनकार्ड, उमेदवाराचा अलीकडील काळातील रंगीत पासपोर्ट साईज २ फोटो, स्वयंघोषणा पत्र, लहान कुटुंब प्रमाणपत्र इत्यादी. वरील व आवश्यक कागदपत्रांवर स्व:स्वाक्षरी करून साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहील. अर्जात नमूद विहित ठिकाणी उमेदवाराचा अलीकडील रंगीत पासपोर्ट साईज फोटो (३.५ X४.५सेमी साईज) चिटकवून त्यावर स्वाक्षरी करावी. अर्ज बंद पाकीटामध्ये विहित ठिकाणी सादर करावा. तसेच अर्जाची व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मुलाखतीसाठी छायांकित ३ प्रती व मूळ दस्तऐवज पडताळणीसाठी मुलाखतीच्या दिवशी घेऊन यावे.

५) **<u>अनुभव प्रमाणपत्राबाबत</u>** :- १) <u>शासकीय संस्था</u> - समाज विकास संस्थेचे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना/ राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान/ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवानोन्नती अभियान अंतर्गत घटकांचे किंवा शासनाकडील योजना/ उपक्रमाचे तत्सम काम करणाऱ्या संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र गाह्य धरण्यात येईल.
२) <u>अशासकीय संस्था</u> - समाज विकास संस्थासाठी शासनाच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना/ राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान/ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान योजने अंतर्गत संस्थेने काम केलेले असेल किंवा तत्सम काम केलेले असल्याचे संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र गाह्य धरण्यात येईल. परंतू सदरच्या संस्थेचे नोंदणीकृत प्रमाणपत्र आणि विहित कालावधीत शासनाकडील योजनेचे तत्सम प्रकारच्या कामाबाबतचे शासनाकडील कागदपत्रे अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

६) **<u>निवड पध्दत</u>** :- अर्ज छाननीत पात्र व गुणतालिकेतील अ.क्र. १ ते ३ मध्ये कमाल गुण धारणकरणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली जाईल. त्यांचीच मुलाखत घेण्यात येईल.

७) **<u>आरक्षण</u>** :- मागासवर्गीय आरक्षित पदांसाठी अर्जासाठी जातीचा दाखला अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. याबाबतचे अंतिम अधिकार आयुक्त, नाशिक मनपा यांना आहे.

८) **<u>स्वयंघोषणापत्र</u>** :- महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण व तत्सम इत्यादी कारवाई संबंधीची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. याबाबत स्वयंघोषणा पत्र देण्यात यावे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराची सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना राहतील.

९) **<u>लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन</u>** :- महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ नुसार जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

१०) मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा खर्च उमेदवारांना दिला जाणार नाही.

११) प्रस्तुत जाहिरातीला अनुसरून अटी-शर्ती प्रमाणे विहित केलेली दिनांक, वेळ व अटी-शर्तीत बदल करण्याचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना आहे. भरतीप्रक्रिया बाबतची सर्व माहिती/ यादी मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल. वैयक्तिक कोणत्याही उमेदवारांना कळविण्यात येणार नाही. अंतिम प्रसिद्ध यादीमधील पात्र उमेदवारांनाच मुलाखतीसाठी प्रवेश दिला जाईल.

१२) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१३) नियुक्ती झालेल्या उमेदवारांस नाशिक महानगरपालिकेमधील सेवेत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

१४) नियुक्ती झालेल्या उमेदवारांस ११ महिण्याकरिता कंत्राटी व मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात येईल.

१५) नियुक्तीस पात्र झालेल्या उमेदवारांस १००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर करारपत्र सादर करावे लागेल.

१६) समान गुण असणाऱ्या उमेदवारास गुणात्मक क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं/१२१५/ (प्र.क्र.५५/१५)/१३अ दिनांक ५ ऑक्टोंबर,२०१५ मधील नमूद केलेल्या निकषावर नियुक्ती देण्यात येईल.

१७) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना आहेत.

१८) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाब आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

Sd/-
अति.आयुक्त(सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)

### कंत्राटी तत्वावरील 'समुदाय संघटक' पद भरतीचा अर्ज

रंगीत (३.५x४.५ से.मी) फोटो व फोटोवर आणि अर्जावर स्व:ताची स्वाक्षरी

प्रति,
मा.आयुक्त सो.,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

१) अर्जदाराचे नाव :- ..........................................................................

(आडनाव प्रथम) (स्व:ताचे नाव) (वडिलांचे/ पतीचे नाव)

२) लिंग :- ☐ पुरुष ☐ स्त्री ३) जन्म तारीख :- ....../....../......

४) दिनांक :- ०१ /०३ /२०१९ रोजीचे वय वर्षे :- ........... महिने :- .......... दिवस :- ........

५) पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ..........................................................................

तालुका :- ..................... जिल्हा :- ..................... पिन कोड :- .....................

६) मोबाईल क्रमांक :- ..................... ७) ई-मेल आयडी:- ..........................................

८) खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गासाठीच अर्ज आहे का? होय ☐ नाही ☐

९) शैक्षणिक पात्रता :-

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळ/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

१०) अनुभवाचा तपशील (शासकीय/ अशासकीय नोंदणीकृत समाज विकास संस्थेमधील कामाचा अनुभव देण्यात यावा) :-

| अक्र | संस्थेचे नाव, ठिकाण आणि पदाचे नाव | कालावधी दिनांक | | एकूण वर्ष व महिना |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

११) SJSRY/NULM योजनेअंतर्गत कामाचा अनुभव आहे काय व किती? होय ☐ नाही ☐ वर्ष ..........

१२) संगणकीय एमएससीआयटी प्रमाणपत्र आहे का :- होय ☐ नाही ☐

१३) अवगत असणा-या भाषा (योग्य ठिकाणी ✓ अशी खून करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

१४) आपणाविरुद्ध न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्त भंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय? (सोबत स्वयंघोषणा पत्र द्यावे) } होय ☐ नाही ☐

१५) उमेदवार शहरी दारीध्य रेषेखालील आहात का? :- होय ☐ नाही ☐

१६) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? :- होय ☐ नाही ☐

१७) अर्जा सोबत कागदपत्रे जोडलेली आहे का? (जाहिरातील अ.क्र.४ मधील):- होय ☐ नाही ☐

१८) मी असे प्रमाणित करतो/ करते की, वर नमूद केलेली माहिती खरी असून,ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

ठिकाण :-

दिनांक :- / /२०१९ स्वाक्षरी : ..............................

नाव : ..............................

**<u>लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन</u>:-**

## प्रतिज्ञापन

**नमुना 'अ' (नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी : ..........................................................................................

श्री. ........................................................................................ यांचा/यांची मुलगी/मुलगी/पत्नी,

वय .......... वर्षे, राहणार ............................................................ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

(१) मी ..................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ........... (संख्या) इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........... आहे. असल्यास दिनांक ....../......../......... (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा)

(३) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : (सही)

दिनांक :

**<u>स्वयंघोषणापत्र</u>:-**

## स्वयंघोषणा पत्र

मी ______________________________________________________ ठिकाण ______________

असे प्रमाणित करतो / करते की, मी नाशिक महानगरपालिका, DAY-NULM योजने अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपातील मानधन तत्वावरील 'समूहसंघटक' या पदासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर केलेला आहे. त्यामधील माहिती खरी असून त्या सोबत आवश्यक दस्तऐवज सादर केलेले आहे. जाहिरातील अटी-शर्ती मधील दस्तऐवजांच्या आधारे मी अर्ज सादर केला आहे. तसेच माझ्या वरती न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगा विषयक प्रकरण व तत्सम कारवाई चालू नसल्याचे मी हे स्वयंघोषणा पत्र देत आहे. याबाबत भविष्यात अडचण उपलब्ध झाल्यास माझी सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात यावी आणि याबाबत झालेल्या कार्यवाहीस मी वैयक्तिक जबाबदार राहील.

ठिकाण :- अर्जदाराचे नाव व सही

दिनांक :-

Sd/-

अति.आयुक्त(सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक